# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office, Palghar**

**Phone No. 02525-297032, Mob No.8669604078**
**Address: SP Office, Bidco Road, Palghar(W)**
**E-mail : propalghar@gmail.com**


**प्रेसनोट दि.११/०७/२०१८**

## पालघर पोलीसचे Official Twitter Account वर मुलीस औषधउपचाराची गरज असल्याने ट्विट करुन मदत मागणा-या व्यक्तीस माणिकपुर पोलीसांकडुन तात्काळ मदत करुन ०६ महिन्याचे मुलीस हॉस्पीटलमध्ये ॲडमीट केले बाबत.

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीत शरद झा यांनी पालघर पोलीसचे ट्विटर अकाऊंटवर त्यांची मुलगी चेत्सना झा वय ६ महिने ही आजारी असल्याने तील हॉस्पीटल मध्ये नेणे गरजेचे असल्याचे मेसेज केला होता. त्यावर त्यांचा राहण्याचा पत्ता विचारुन ते माणिकपुर पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणार असल्याने तात्काळ माणिकपुर पोलीस ठाण्यात कळवुन आयरिश बिल्डींग सनसिटी येथे तात्काळ पोलीस कॉन्स्टेबल/३९९ संतोष गिते यांना पाठविले होते. पोलीस कॉन्स्टेबल गिते यांनी बिल्डींगखाली पाणी भरलेले असताना देखील स्वतःचा जिव धोक्यात घालुन पाण्यातुन जावुन चेत्सना झा वय ०६ महिने हीस सदर बिल्डींग मधुन बाहेर आणुन आस्था हॉस्पीटलमध्ये ॲडमिट केले आहे.

अतिवृष्टीमुळे झालेल्या परिस्थीतीमुळे निर्माण झालेल्या अडचणीबाबत पालघर जिल्हा पोलीस दलाकडुन योग्य ती मदत आपल्याला करित आहोत. सर्व प्रशासन आपल्या परीने योग्य ती मदत करित आहेत. काही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास पोलीस नियत्रंण कक्ष किंवा स्थानिक पोलीस ठाणे येथे कळवा.

**पोलीस नियंत्रण कक्ष ८६६९६०४१००,९७३०७११११९, ०२५२५-२९७०२३**

**जिल्हा आपत्ती नियंत्रण कक्ष ०२५२५-२९७४७४**

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी ९१५८७६०७५६**